

## रयत शिक्षण संस्थेचे

# आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज रामानंदनगर (बुर्ली)

## सांस्कृतिक विभाग

**दिनांक :२२/०९/२०२०**

रयत शिक्षण संस्थेचे आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, स्वा .रा .विद्यालय व सौ ल.भा. पाटील कन्या विद्यालय रामानंदनगर( बुर्ली) यांच्या संयुक्त विद्यमाने पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची 133 वी जयंती सोहळा मंगळवार दिनांक 22 सप्टेंबर 2020 रोजी सकाळी ११.३० वाजता ऑनलाइन संपन्न झाला

कार्यक्रमाची सुरुवात कर्मवीर प्रतिमा पूजनाने झाली. प्रतिमा पूजनावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. महेंद्र (आप्पा) लाड ,कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती असलेले श्री. जे. के. (बापू) जाधव महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल.डी., कदम स्वा.रा. विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.डी.एम. जाधव व ल.भा. कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. एल. एस. पाटील इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

रयत गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली .त्यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल.डी. कदम साहेब यांनी उपस्थितांचे स्वागत व प्रास्ताविक केले. प्रास्ताविकात महाविद्यालयातील निकालाचा व उपक्रमाचा धावता आढावा घेतला. त्याबरोबरच महामारी चे संकट ‘कोरोना’ यामुळे देश पिळवटून निघत आहे. त्यात आपल्याला महाविद्यालयाच्या वतीने समाज प्रबोधन करणे व वेळप्रसंगी रुग्णांना महाविद्यालय परिसरात अनेक सुविधा देण्यासाठी कोव्हिड मदत केंद्र स्थापन करून सहकार्य करण्याचा मानस असल्याचे प्रतिपादन केले सदर कार्यक्रम महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या व मान्यवरांच्या उपस्थितीत परंपरेप्रमाणे न घेता ऑनलाईन घेण्याची वेळ आली अशी खंतही व्यक्त केली.

त्यानंतर कार्यक्रमाचे कार्याध्यक्ष श्री .प्रा. डी. एस. पाटील यांनी रयत संकुलातील तिन्ही शाखांचे अहवाल वाचनात तिन्ही शाखेची माहिती देऊन निकालाची परंपरा उज्ज्वल असल्याचे प्रतिपादन केले. तसेच रयत संकुलाने कर्मवीर अण्णांच्या तत्वाचा विसर पडू दिला नाही. रयत संकुलाने रामानंद नगर पंचक्रोशीत आपला आगळा वेगळा ठसा उमटविला आहे . आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे असे सांगितले.

त्यानंतर स्वा.रा .विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. जाधव डी. एम. यांनी कार्यक्रमासाठी उपस्थित असलेल्या प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा.प्रा.श्री सतिश शिर्के ( राधाबाई काळे महिला महाविद्यालय, अहमदनगर) यांनी मनोगत व्यक्त केले .मनोगतात विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच श्रमप्रतिष्ठा जोपासली पाहिजे. महाविद्यालयात विद्यार्थी केंद्रित अनेक उपक्रम राबवले जातात. सांस्कृतिक वारसा जोपासला पाहिजे म्हणून सांस्कृतिक विभाग कार्यरत असते. तसेच राष्ट्रीय सेवा योजनेतून व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो म्हणून विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. गुणात्मक व मूल्यात्मक शिक्षणाबरोबरच शिस्तीचे धडे गिरवले पाहिजेत. समाजात पदार्पण करताना महाविद्यालयीन जीवनातच सर्व परिपक्व होऊन ताऊन सुलाखून बाहेर पडला पाहिजे.तरच समाजात तो टिकू शकतो म्हणून रयतच्या तत्त्वाचा अंगीकार केला पाहिजे यासाठी पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील( अण्णा )यांच्या कार्याचा आढावा घेऊन, त्यांच्या आठवणी त्यांच्या आयुष्यातील महत्वाच्या घडामोडी आणि अण्णांचा वारसा या नव्या पिढीने जतन केला पाहिजे याबाबत त्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती असलेले मा. श्री. जे .के.( बापू) जाधव( महाविद्यालय विकास समिती सदस्य) यांनी महाविद्यालयाच्या विकासासाठी आपल्याला खूप काही करायचे आहे .निकालाची परंपरा उज्वल असली तरी हे महाविद्यालय समाज परिवर्तनाचे केंद्र झाले पाहिजे आणि परिसरातील महाविद्यालयाने आपला आदर्श घेतला पाहिजे. आमच्या प्राध्यापकांनी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी जे परिश्रम घेतले त्याचा मी साक्षीदार आहे .NAAC कमिटीकडून ‘अ ‘दर्जा प्राप्त झाला पण एवढ्यावरच समाधान न मानता गुणात्मक व म मूल्यात्मक वाढीबरोबरच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास हाच आपला ध्यास असला पाहिजे.’ पुस्तक चे संस्कृतीचे मस्तक असते ‘याप्रमाणे शिक्षक व विद्यार्थ्यांनी पुस्तकांशी मैत्री केली पाहीजे असे आपल्या मनोगतातून मोलाचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. महेंद्र (आप्पा) लाड सदस्य, महाविद्यालय विकास समिती यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान आणि त्यांनी केलेला त्याग व कष्ट याचा उल्लेख आपल्या भाषणातून केला. तसेच त्यांनी आत्ताच आपल्या बापूंनी काही महत्वाचे मुद्दे सांगितले ते मी परत सांगणार नाही. पण महाविद्यालयाला शिक्षण महर्षी डॉ. पतंगराव कदम साहेब यांचे नाव देण्याचे निश्चित झाले होते. हा सोहळा आपण घेणार होतो. पण आपल्या परिसरात नैसर्गिक आपत्ती पुराने थैमान घातले त्यामुळे हा कार्यक्रम काही काळासाठी पुढे ढकलण्यात आला. पण तो आता नामकरण सोहळा घेणे गरजेचे आहे. कै. मा. पतंगराव कदम साहेबांचा आदर्श शिक्षण क्षेत्रात सर्वांनीच घेण्यासारखा आहे ही आपली बांधिलकी आहे. ज्ञान मंदिरात येताना राजकारणाचे जोडे बाहेरच ठेवले पाहिजे.हे जर आपण निष्ठेने केले तर महाविद्यालयाचा व समाजाचा विकास व्हायला फारसा वेळ लागणार नाही असे ते बोलत होते.

कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापक सौ पाटील यांनी सर्व मान्यवर व उपस्थितांचे आभार मानले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ शिंदे एस के यांनी केले.

शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली अशा रीतीने ऑनलाइन पद्धतीने 133 वी कर्मवीर जयंती सोहळा संपन्न झाला.

| | |
|---|---|
| लाभार्थी संख्या :१ ३ ३ | कार्यक्रमाचे फलिते : कर्मवीर अण्णांच्या कार्याची माहिती झाली . |








**कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांच्या पुतळ्यास मालार्पण करताना तसेच त्यांच्या प्रतिमेचे पूजन करताना**

**कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.महेंद्र (आप्पा) लाड , मा. जे.के (बापू) जाधव व मान्यवर**





अहवाल वाचन करताना प्रा.डी.एस.पाटील.




प्रमुख पाहुण्यांचे स्वागत व प्रास्ताविक करताना महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्य **डॉ.एल.डी.कदम.**




**मनोगत व्यक्त करताना मा.जे.के.(बापू) जाधव**




**कार्यक्रमासाठी उपस्थित असणारे मान्यवर**

प्रा. प्रतिभा गुदाले
नेतृत्व,
सांस्कृतिक विभाग

प्राचार्य,
आर्टस, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज रामानंदनगर (बुर्ली)